| भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ प्रकरण – २१ चे कलम २७४ अन्वये संक्षिप्त संपरिक्षा केलेल्या खटल्यातील आरोपीचे प्रतिकथन. | |
|---|---|
| **श्रुती ह. पाटील न्यायदंडाधिकारी वर्ग – १ देवरुख, यांचे न्यायालयात** | |
| **समरी फौजदारी केस नं. ७५/२०२४** | **निशाण क्रमांक – ११** |
| १) गुन्हा घडल्याची तारीख | दि. ०९/०१/२०२४ |
| २) फिर्याद दाखल केल्याची तारीख | दि. १०/०१/२०२४ |
| ३) तक्रारदार याचे नांव, वय आणि पत्ता इत्यादी | विवेक धोंडू साळवी, वय – ५५ वर्षे,<br>संगमेश्वर पोलीस ठाणे. |
| ४) आरोपी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील. | **आशिष महेश नलावडे, वय –** २२ वर्षे,<br>**राहणार** – करजुवे, ब्राम्हणवाडी,<br>ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. |
| ५) गुन्ह्याचा ठेवण्यात आलेला तपशील सर्व आरोपीस सविस्तर विशद करुन सांगितला. | |

**अ.** तुम्ही या न्यायालयाच्या स्थळ सिमेत दिनांक ०९/०१/२०२४ रोजी ०२.०५ वाजताच्या सुमारास तुमच्या ताब्यातील वाहन पॅशन प्रो मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएम–०१८२ या गाडीच्या विम्याची मुदत संपलेली असताना सदरचे वाहन करजुवे ते माखजन जाणारे रस्त्यावरुन अतीवेगात व हयगयीने रस्त्याची विशीष्ठ परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन सार्वजनिक ठिकाणी लोकांची सुरक्षीतता लक्षात न घेता चालवला. म्हणून तुम्ही त्याव्दारे **भा.दं.वि.का.कलम २७९** प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे.

दुसरे असे की, वर नमुद दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन पॅशन प्रो मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएम–०१८२ या गाडी हे करजुवे ते माखजन जाणारे रस्त्यावरून घेवून जात असताना अति वेगात हयगयीने, अविचाराने,

निष्काळजीपणे चालवून रसत्याने चालत जाणारी पादचारी अपर्णा मनोहर चांदीवडे हीला ठोकर देवून अपघात केला व तिच्या लहान मोठया गंभीर दुखापतीस मृत्युस कारणीभूत झालात, म्हणून तुम्ही भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३०४(अ) अन्वये माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

तिसरे असे की, वर नमुद दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन करजुवे ते माखजन जाणाऱ्या रस्त्यावरुन चालवित घेऊन जात असताना अतीवेगात व हयगयीने चालवून रस्त्याने चालत जाणारी पादचारी सौ. अपर्णा मनोहर चांदीवडे हीला ठोकर देवून अपघात केला. म्हणून तुम्ही त्याव्दारे **मो.वा.का.कलम १८४** प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे.

चौथे असे की, वर नमुद दिवशी, ठिकाणी, वेळी तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन पॅशन प्रो मोटार सायकल क्रमांक एमएच–०८–एएम–०१८२ हया वाहनाचा विमा उतरवलेला नसताना सार्वजनिक ठिकाणी चालवुन अपघात केला. म्हणून तुम्ही त्याव्दारे **मो.वा.का.कलम १४६/१९६** प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे.

ब. कलम आणि कायदा – **भारतीय दंड संहिता कायदा कलम २७९, ३०४–अ, मो.वा.का.कलम १८४, १४६/१९६.**

५. सदर दोषारोपाचे अनुषंगाने या न्यायालयातर्फे तुमच्या विरुध्द खटला चालविणेत येत आहे व त्याबाबतचे निर्देश मी तुम्हास देत आहे.

६. **<u>आरोपीचे निवेदन</u>** –

प्र.क्र.१. तुम्हाला पोलीस तपास कामाच्या नक्कला मिळाल्या काय ?

उत्तर. होय.

प्र.क्र.२. तुमचेवर ठेवणेत आलेला आरोप तुम्हाला आता मराठीतून वाचून व

समजावून सांगितला तो समजला काय ?

उत्तर. होय.

प्र.क्र.३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर. नाही. मला गुन्हा कबुल नाही.

आरोपीची सही -----------

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2024.09.20 17:20:57 +0530

**स्थळ – देवरुख** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. २०/०९/२०२४** **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**

**देवरुख.**